नगर परिषद सार्वत्रिक
निवडणूका-२०२५
आरक्षण आदेश.

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.१०/का-६
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांकः- ०३/१०/२०२५

संदर्भ :-१. राज्य शासन, नगर विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.एमसीओ-२०२१/प्र.क्र.१९२/नवि- १४, दि. १५ डिसेंबर, २०२१
२. या कार्यालयाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का-६, दि.२७ डिसेंबर, २०२१
३. महाराष्ट्र अधिनियम क्र.२०/२०२२, दि.१ फेब्रुवारी, २०२२
४. महाराष्ट्र अधिनियम क्र.२१, दि.११ मार्च, २०२२
५. नगरविकास विभागाचे .एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१० जून, २०२५ व दि.१२ जून, २०२५
६. या कार्यालयाचे आदेश क्रमांक- रानिआ/नप- २०२५/प्र.क्र.०५/का-६, दि.१६ जून,२०२५
७. नगर विकास विभाग, क्र.एमसीओ-२०२५ /प्र.क्र.२४२/नवि-१४, दि. १६ जून २०२५.

## आ दे श

**ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदींनुसार:-

i) नगरपरिषदांच्या निवडणुकांचे अधिक्षण (Superintendence), संचालन (Direction) व नियंत्रणाचे (Control) पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित (Vested) केले आहेत.

ii) नगरपरिषदेच्या निवडणुका मुक्त (Free), न्याय्य (Fair) व पारदर्शक (Transparant) वातावरणात पार पाडण्याची पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

**ज्याअर्थी,** नगरपरिषद निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे, विधानसभा मतदार यादीचे प्रभाग निहाय विभाजन करणे आणि प्रत्यक्ष निवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या तिन्ही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये नियम ९ च्या पोट - कलम २ व कलम ३४१ (ब) मधील तरतूदीनुसार नगर परिषदाच्या सदस्यांची संख्या निश्चित करावयाचे अधिकार आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना आहेत. त्यानुसार नगरपरिषदामधील सदस्य संख्या राज्य शासनाच्या नगर विकास विभाग, क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१६ जून, २०२५ रोजीच्या आदेशानुसार प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त यांनी सोबत परिशिष्ट-१ मध्ये दर्शविल्यानुसार निश्चित केली आहे.

**ज्याअर्थी,** मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व त्यासोबत संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०६/०५/२०२५ रोजी दिलेला निर्देश तसेच नगर विकास विभागाचे क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१६ जून, २०२५ रोजीच्या पत्रात नमूद केल्यानुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांना आरक्षण दिले आहे.

**ज्याअर्थी,** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०६/०५/२०२५ रोजीच्या निर्देशाच्या अनुषंगाने नगर विकास विभागाने दि.१०/०६/२०२५ व दि.१४/०८/२०२५ रोजीचे पत्रान्वये निर्गमित केलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार २४७ नगरपरिषदांची अंतिम प्रभाग रचना **दि. ३० सप्टेंबर, २०२५** रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**ज्याअर्थी,** राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक एमसीओ-२०२१/प्र.क्र.१९२/नवि-१४, दि. १५ डिसेंबर, २०२१ अन्वये "महाराष्ट्र नगरपरिषदा ( प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ अन्वये सुधारीत नियम निर्गमित केले असून त्यामध्ये सदर नियम अस्तित्वात आल्यापासून आरक्षणाच्या प्रयोजनार्थ या नियमाच्या प्रारंभानंतर घेतलेल्या सार्वत्रिक निवडणूका हया पहिली निवडणूक असल्याचे मानण्यात येईल असे नमूद केले आहे.

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ मधील कलम १०(१)(ब), महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम,१९६६ नियम ३(क) मधील सुधारणा तसेच न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने नगरपरिषदांच्या निवडणुकीकरिता आरक्षण सोडतीच्या कार्यपध्दतीबाबत सुधारीत आदेश देणे आवश्यक असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

**त्याअर्थी,** मी, दिनेश वाघमारे, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० अ (२) आणि १० अ (४) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणेबाबत यापूर्वीचे दि.२७/१२/२०२१ व दि.२२/०७/२०२२ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे सुधारीत आदेश देत आहे:-

१. **संक्षिप्त नाव:**

या आदेशाला **"नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण) आदेश, २०२५"** असे संबोधिले जाईल.

२. **अधिकार प्रदान:**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १० (१) (ब) मधील तरतुदीनुसार सदस्य आरक्षण निश्चित करणेबाबतचे राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार आयोगाच्या दि.१६/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये संबंधित विभागीय आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

i) जिल्हाधिकारी यांनी सर्व नगरपरिषदांकरिता आरक्षण सोडत व तत्सम कामकाजासाठी उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

ii) या नुसार नेमणूक केलेल्या अधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास आरक्षणाची सोडत काढावी. त्यासाठी अशा अधिकाऱ्याने प्रथम अनु.जाती व अनु.जमातीसाठी परिशिष्ट २ व ३ नुसार प्रभाग निश्चित करावेत. त्यानंतर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण (अनुसूचित जाती,

अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) यांच्या जागांसाठी आरक्षण सोडतीचे प्रारुप प्रसिध्द करावे व त्यावर हरकती व सूचना मागवाव्यात.

iii) सदर हरकती व सूचना संबंधित नगरपरिषदांच्या मुख्याधिकारी यांचे कार्यालयात (असल्यास) सादर केल्या जातील. मुख्याधिकारी यांनी सर्व प्राप्त हरकती व सूचना एकत्रित करून जिल्हाधिकारी यांच्याकडे विहीत वेळेत सादर कराव्यात.

iv) जिल्हाधिकारी यांनी प्राप्त हरकती व सूचनांवर आवश्यक असेल तेथे सुनावणी घ्यावी.

v) जिल्हाधिकारी हरकती व सूचनांवरील आपल्या अभिप्रायासह आरक्षणाचे प्रस्ताव अंतिम मान्यतेकरिता संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करतील.

vi) संबंधित विभागीय आयुक्त यांनी आरक्षणाच्या प्रस्तावास अंतिम मान्यता द्यावी व ते शासन राजपत्रात प्रसिध्दीसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावेत.

विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी या निवडणुकांचे कामकाज पार पाडताना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व दक्षता व काळजी घेणे आवश्यक आहे. आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय्य व पारदर्शक रितीने पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

**३. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याकरिता पहिली निवडणूक :**

नगर विकास विभागाचे अधिसूचना क्रमांक एमसीओ-२०२१/प्र.क्र.१९२/नवि-१४ दि.१५/१२/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या "महाराष्ट्र नगरपरिषदा ( प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत ) नियम, २०२१ मधील नियम ०८ नुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सदर निवडणूक ही पहिली निवडणूक मानली जाईल.

**४ अनुसूचित जातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे:**

अनुसूचित जातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप

करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ मधील नियम क्र. ३ च्या तरतुदीनुसार करावयाचे आहे. याकरिता प्रभागातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची संबंधीत नगर परिषदेच्या एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी **परिशिष्ट – २** नुसार करण्यात येईल. त्यानंतर सदर नियमातील तरतुदीनुसार उतरत्या क्रमाने प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी अनुसूचित जातीसाठी निश्चित केलेल्या संख्येइतक्या प्रभागात अनुसूचित जातीची प्रत्येकी एक जागा वाटप करण्यात येईल.

**५ अनुसूचित जमाती करिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे.**

अनुसूचित जमातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ मधील नियम क्र. ४ च्या तरतुदीनुसार करावयाचे आहे. याकरिता प्रभागातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची संबंधीत नगरपरिषदेच्या एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी **परिशिष्ट – ३** नुसार करण्यात येईल. त्यानंतर सदर नियमातील तरतुदीनुसार उतरत्या क्रमाने, प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी अनुसूचित जमातीसाठी निश्चित केलेल्या संख्येइतक्या प्रभागात अनुसूचित जमातीची प्रत्येकी एक जागा वाटप करण्यात येईल.

**६ एकाच प्रभागात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जागा येत असल्यास :-** शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ मधील नियम क्र. ५ च्या तरतुदीनुसार अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागा नेमून देतेवेळी अनुसूचित जातींच्या जागा आणि अनुसूचित जमातींच्या जागा लोकसंख्येच्या टक्केवारीच्या आधारे जर एकाच प्रभागामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती

या दोन्हींसाठी जागा आरक्षित होत असतील तर, त्या प्रभागातील जागा ही या दोन प्रवर्गापैकी ज्या प्रवर्गाच्या लोकसंख्येची टक्केवारी अधिक असेल, अशा प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात येईल.

जर एखादा प्रभाग अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता उतरत्या क्रमाने आरक्षित होत असेल आणि अनुसूचित जाती व अनूसुचित जमाती दोघांचीही त्या प्रभागातील टक्केवारी समान असेल तर तो प्रभाग अनुसूचित जमातीकरीता आरक्षित होईल, कारण अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही विशिष्ट क्षेत्रामध्येच समाविष्ट असते.

७ **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय होत असल्यास** – जर नगरपरिषदेमध्ये अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय होत असल्यास, प्रथम निवडणुकीत ते त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीने निश्चित करण्यात येईल. जर मागील निवडणुकीत तसेच या निवडणुकीत एकच पद देय होत असेल तर जर ते पद मागील निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असल्यास या निवडणुकीत ते पद त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित राहणार नाही. याचप्रमाणे जर मागील निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित केले नसेल तर या निवडणुकीत ते पद त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होईल.

८ **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे :-**

(अ) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरीता प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी निश्चित केलेल्या संख्येच्या मर्यादेत राखून ठेवावयाच्या नगरपरिषद सदस्यांच्या जागांची संख्या ही, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागांच्या संख्येइतकी अथवा कमी असेल तर-

(एक) प्रथम जर त्याठिकाणी तीन सदस्यांचा प्रभाग असेल आणि त्या प्रभागातील जास्तीत जास्त एक जागा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवण्यात आली असेल तर त्या प्रभागातील एक जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता थेट नेमून देण्यात यावी.

(दोन) त्यानंतर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता एक जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित दोन सदस्यीय प्रभागामधून सोडत काढून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील एक जागा वाटण्यात यावी.

(ब) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरिता प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी निश्चित केलेल्या संख्येच्या मर्यादेत राखून ठेवावयाच्या नगरपरिषद सदस्यांच्या जागेची संख्या ही, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल तर,

(एक) पहिले असे की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागातील एक जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता नेमून देण्यात येईल.

(दोन) दुसरे असे की, जर एका प्रभागात तीन जागा असतील आणि जास्तीत जास्त एक जागा अनुसूचित जातींकरिता किंवा अनुसूचित जमातींकरिता किंवा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवलेली असेल तर अशा प्रभागातील एक जागा थेट नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता नेमून देण्यात येईल.

(तीन) त्यानंतर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या उर्वरित जागा, कोणत्याही असतील तर, त्या प्रभागांमध्ये एक जागा अनुसूचित जातीकरिता किंवा अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवलेली असेल अशा दोन सदस्यीय प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(चार) वरील खंड (एक), (दोन) व (तीन) नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागांचे वाटप केल्यानंतर देखील जर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या काही जागा अजूनही शिल्लक राहत असतील तर, ज्या प्रभागांमध्ये किमान एक जागा कोणत्याही प्रवर्गासाठी राखून ठेवलेली नसेल अशा सर्व प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

**९ महिलांचे (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारणसह) आरक्षित प्रभाग निश्चित करणे :**

शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ मधील नियम क्र. ७ मध्ये अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिलासाठी जागा वाटप करण्याची पध्दत विहित केलेली आहे

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी जागा वाटप उपरोक्त नियमातील नियम क्र. ७ (२) नुसार करण्यात यावे. तसेच नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरीता जागांचे वाटप उक्त नियमातील नियम क्र. ७ (३) व सर्वसाधारण महिलांकरिता उक्त नियमातील ७ (४) मधील तरतूदीनुसार करण्यात यावे.

**१० महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण सह) आरक्षणाची सोडत काढणे:**

१०.१ राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास नगरपरिषद क्षेत्रामध्ये जिल्हाधिकारी किवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नाही, अशा अधिकाऱ्यांच्या अध्यक्षेतेखाली सभा आयोजित करून नागरिकांच्या समोर सोडत पध्दतीने महिला ( अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सर्वसाधारण सह) राखीव जागांचे आरक्षण निश्चित करावे.

१०.२ सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यांना मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. ( उदा. वृत्तपत्रे, नगरपरिषद मुख्यालय व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेब साईट, इत्यादी ) आरक्षणाची सोडत व प्रसिध्दी याकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचनेचा नमुना **परिशिष्ट- ०४** मध्ये देण्यात आला आहे.

१०.३ नगरपरिषद निवडणुकांकरिता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्वे सोबतच्या परिशिष्ट- ०५ मध्ये नमूद करण्यात आलेली आहेत.

१०.४ सोडतीचे योग्यप्रकारे इतिवृत्त लिहिण्यात यावे. इतिवृत्ताचा नमुना **परिशिष्ट- ०६** मध्ये देण्यात आलेला आहे.

## ११ आरक्षणांची व्यापक प्रसिद्धी:

११.१ प्रत्येक प्रवर्गातील महिलांच्या जागांची सोडत काढल्यानंतर निश्चित करण्यात आलेल्या जागांचे आरक्षण नमूद करुन प्रारुप आरक्षणाची अधिसूचना जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

११.२ प्रसिध्द करण्यात आलेल्या आरक्षणाच्या विहित नमुन्यांवर संबंधीत मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे अनिवार्य आहे.

११.३ सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील परिशिष्ट- ०७ व ०८ मध्ये नमूद करावा.

११.४ सोडतीचा निकाल वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा.

११.५ महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार सोडतीमध्ये आलेले प्रभाग निहाय आरक्षण नमूद करूनच ते प्रसिध्द करण्यात यावे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली ही कार्यपध्दती योग्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने अहमदनगर महानगरपालिकेशी संबंधित रिट पिटीशन क्रमांक- ३६४८/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयात नमूद केले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समान पध्दतीचा अवलंब करणे योग्य असल्याने, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिला (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसह) यांच्याकरिता कोणते प्रभाग आरक्षित होतील, हे निश्चित करण्यात येतील.

## १२ हरकती व सूचना:

१२.१ आरक्षण सोडतीअंती नागरिकांना आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीची माहिती देण्यात येईल.

१२.२ आरक्षणाची अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व त्या कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. उदा. वृत्तपत्रे, नगरपरिषदा प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेबसाईट, इत्यादी

१२.३ हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना स्विकारण्याची व्यवस्था नगरपरिषद कार्यालयात करण्यात यावी.

१२.४ हरकती किंवा सूचना दाखल केल्याची संबंधीतांना पोहचपावती देण्यात यावी, ज्यामध्ये त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद केला जाईल. तसेच पोहच देणारा अधिकारी / कर्मचारी यांचे नाव, पद व स्वाक्षरी स्पष्ट स्वरुपात नमूद असावी.

१२.५ प्राप्त हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

१२.६ प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांचा गोषवारा तयार करण्यात यावा आणि सदर गोषवारा नेमून दिलेल्या दिनांकास जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात यावा.

१२.७ आरक्षणावर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल, याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी. उदा. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी

१३ **प्रारुप आरक्षणावर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर आवश्यक असल्यास सुनावणी देणे–**

१३.१ प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निश्चित केलेल्या स्थळी व नेमून दिलेल्या दिनांकास / कालावधीमध्ये आवश्यक असल्यास सुनावणी देण्यात यावी.

१३.२ या सुनावणीकरिता सर्व व्यवस्था उदा. हरकतदारांना सुनावणीची लेखी नोटीस देणे, उपस्थितांची स्वाक्षरी घेणे, सुनावणीचे विवरणपत्र ठेवणे, सुनावणीच्या ठिकाणी व्हिडिओ चित्रीकरणाची व्यवस्था करणे, इत्यादी जिल्हाधिकारी यांचे मार्फत करण्यात यावी.

१३.३ सुनावणीच्यावेळी केलेले आरक्षण सर्वांना दिसेल अशाप्रकारे मोठ्या स्क्रीनवर / बोर्डावर दर्शविण्यात यावे.

१३.४ हरकती व सूचनांना सुनावणी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रत्येक तक्रार व सूचनांची दखल घेऊन नियमाप्रमाणे योग्य ते अभिप्राय देणे आवश्यक आहे. अंतिम आरक्षण हे शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्याची आवश्यकता नाही.

१४ **अंतिम आरक्षण प्रसिध्द करणे :**

१४.१ सुनावणीनंतर तयार केलेला आरक्षणाचा प्रस्ताव, हरकती व सूचना, दिलेल्या सुनावणीच्या गोषवाऱ्यासह जिल्हाधिकारी यांनी स्वाक्षरी करुन संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करावा.

१४.२ विभागीय आयुक्तांनी प्रस्तावास मान्यता देतांना सुचविलेल्या सुधारणासह (असल्यास) त्यानुसार प्रस्तावात व संबंधित विवरणात आवश्यक ते बदल करुन जिल्हाधिकारी यांनी अंतिम आरक्षणाची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

१४.३ या अंतिम अधिसूचनेला व्यापक प्रसिध्दी द्यावी (उदा. वृत्तपत्रे, नगरपरिषद व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड / वेब साईट, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईट, इत्यादी). राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अंतिम आरक्षणाच्या अधिसूचनेची **एक प्रत** राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात यावी.

१४.४ यानंतर अंतिम आरक्षणावर कोणतीही हरकत अगर सुनावणी घेणे नियमानुसार अभिप्रेत नाही.

१५ **सर्वसाधारण**

१५.१ भारताच्या संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाचे पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित केले आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा मुख्याधिकारी यांना स्वतःहून निवडणूक कार्यक्रमात कोणताही बदल करणे अथवा त्यास स्थगिती देता येणार नाही.

१५.२ राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद निवडणूक संदर्भात आरक्षण या विषयावर यापूर्वी काढलेले आदेशात काहीही म्हटले असले तरी, जोपर्यंत आयोग बदल करत नाही तोपर्यंत यापुढे होणाऱ्या सर्व निवडणूकांमध्ये केवळ **नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक ( आरक्षण ) आदेश, २०२५** या आदेशामध्ये केलेल्या तरतुदी लागू राहतील.

( दिनेश वाघमारे )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

**सहपत्र** :- सोबतचे परिशिष्ट १ ते १०

प्रति,

१. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, कोकणभवन, बेलापूर, नवी मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
४. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
५. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपंचायत
६. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
७. आयोगातील सर्व कार्यासने
८. निवड नस्ती.

# परिशिष्ट - १

(सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना खालील आदेशाप्रमाणे करण्यात आलेली आहे.)

__________नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूक _______(सन)

१. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचे क्र.नपा-२/२०२५/१६६४, १६६५, १६६७, १६६६दि.११, जुलै, २०२५
२. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग, यांचे क्र.न.पा.प्र.४/कावि/१९९, २००, २०१, २०२, २०३, २०२५, दि.११, जुलै, २०२५
३. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, यांचे क्र.न.प.प्र./निवडणूक/कार्या-ई-२१३६२५८/नंदुरबार/२०२५, दि.११, जुलै, २०२५
४. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, यांचे क्र. क्र.न.प.प्र./निवडणूक/कार्या-ई-२१३६२५८/एनएसके/२०२५, दि.११, जुलै, २०२५
५. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, यांचे क्र. क्र.न.प.प्र./निवडणूक/कार्या-ई-२१३६२५८/धुळे/२०२५, दि.११, जुलै, २०२५
६. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, यांचे क्र. क्र.न.प.प्र./निवडणूक/कार्या-ई-२१३६२५८/एएचआय/२०२५, दि.११, जुलै, २०२५
७. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, यांचे क्र. क्र.न.प.प्र./निवडणूक/कार्या-ई-२१३६२५८/जेएल/२०२५, दि.११, जुलै, २०२५
८. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग, यांचे क्र. जा.क्र.२०२५/नपाप्र/निवडणूक/कावि-३४५, ३४६, ३४७, ३४८, ३४९, ३५०, ३५१, ३५२, दि.११, जुलै, २०२५
९. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, यांचे क्र. विआका-नपाप्र-कार्या-८-निवडणूक-यवतमाळ-७२, ७३, ७४, ७५, ७६-२०२५, दि.१०, जुलै, २०२५
१०.प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, यांचे क्र. एमयुएन१९(३)-कावि-४८९,४९०,४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ४९७, ४९८, ४९९, ५००, ५०१, ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०६, ५०७, ५०८, ५०९, ५१०, ५१२, ५१३, ५१४, ५१५, ४६३, ४६४, ४६५, ४६६, ४६७, ४७४, ४७५, ४७६, ४७७, ४७८, ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६, ४८७, ४८८, ४६९, ४७०, ४७१, ४७२, ४७३, ४६०, ४६१, ४६२-२०२५ दि.१०, जुलै, २०२५

| परिशिष्ट – २ (अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ………………… MUNICIPAL COUNCIL | | | | | | |
| STATEMENT SHOWING SCHEDULE CASTE DESCENDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | SC% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही

मुख्याधिकारी, -----------नगरपरिषद

| परिशिष्ट – ३ (अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ………………… MUNICIPAL COUNCILS | | | | | | |
| STATEMENT SHOWING SCHEDULE TRIBE DESCENDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | ST% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही

मुख्याधिकारी, -----------नगरपरिषद

## परिशिष्ट – ४

## (सोडत व आरक्षण प्रसिध्दी – जाहीर सूचनेचा नमुना)

### नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूक -----

जाहीर सूचना

---------- नगरपरिषदेच्या सन ------ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणेसाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार ---------<br>दिनांक ---------<br>वेळ -------- वा.<br>स्थळ - ----------<br>------------ |
| २ | आरक्षण प्रसिध्द करण्याचा दिनांक | ------वार, दिनांक ------ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | -----वार, दिनांक --------- ते<br>-----वार, दिनांक ---------<br>(दुपारी ३.०० वा.पर्यंत) |
| टीप : हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरीकांना आवश्यक असल्यास सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. | | |

**ठिकाण** :-------------

**संबंधित अधिकारी,**

**दिनांक** :-------------

-------नगरपरिषद

# परिशिष्ट - ५

## (नगरपरिषद निवडणूकांकरीता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे)

१. नगरपरिषदेच्या आरक्षणाची सोडत राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिवशी काढण्यात यावी.
२. सोडतीच्या तीन ते चार दिवस अगोदर सोडतीची रंगीत तालीम करण्यात यावी.
३. सोडतीचे इतिवृत्त लिहिण्यात यावे.
४. सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उप जिल्हाधिकारी पेक्षा दर्जाच्या कमी नसलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात यावी.
५. सोडतीच्या प्रसिध्दीसाठी करावयाच्या जाहीर सूचनेचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने परिशिष्टांमध्ये विहित केल्यानुसार राहील. ही सूचना सोडतीच्या दोन/तीन दिवस आधी किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.तसेच सोडतीबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.
६. सोडतीसाठी पारदर्शक ड्रम वापरण्यात यावा.
७. ड्रममध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A4 या आकाराचा असावा.
८. चिठ्ठी रोल करुन त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावे व ते चिठ्ठीच्या मध्यभागी लावावेत.
९. सोडतीच्यावेळी सर्व प्रभाग दर्शविणारा एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाचा हद्दी दर्शविणारा स्वतंत्र नकाशा ठळकपणे दिसेल अशारितीने लावून ठेवावा. प्रत्येक प्रभागाच्या सीमा सोडतीच्या वेळी स्पष्ट करण्यात याव्यात.
१०.सोडत शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात यावी.
११.कोणत्या पदांच्या आरक्षणाची सोडत कोणत्या प्रभागातून कशाप्रकारे काढण्यात येणार आहे याची सविस्तर माहिती दर्शविणारे पत्रक तयार करून सर्व उपस्थितांना सोडतीपूर्वी वाटण्यात यावे तसेच त्याला पुरेशी प्रसिद्धी देण्यात यावी.
१२.सोडतीमध्ये आलेला जागा क्रमांक प्रोजेक्टरद्वारे मोठया पडद्यावर दाखविण्यात यावा.
१३.संपूर्ण सोडत प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात यावे.
१४.सोडतीचे प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करणे शक्य असल्यास करावे.
१५.नागरिकांना सोडतीची सविस्तर माहिती देण्यासाठी एक प्रसिद्धीपत्रक तयार करुन त्यास पुरेशा आधी खाली नमूद केल्याप्रमाणे व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात यावी.

i) नगरपरिषदेच्या सूचना फलकावर

ii) नगरपरिषदेच्या प्रभाग समितीच्या सूचना फलकावर

iii) नगरपरिषदेच्या इतर कार्यालयांमध्ये सूचना फलकावर

iv) स्थानिक केबल टिव्हीवर, फ्लेक्स बोर्ड तयार करून शहरात मुख्य ठिकाणी लावण्यात यावेत.

१६. सोडतीसाठी उपस्थितांच्या नाव, स्वाक्षरी घेण्यात याव्या.

# परिशिष्ट -६

## इतिवृत्ताचा नमुना

आज दि...................... रोजी सकाळी / दुपारी................. वाजता ............. नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी यथास्थिती प्राधान्यक्रमाने अथवा चिठ्ठ्या टाकून जागांचे आरक्षण निश्चित करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात आली-:

१. प्रथम उपस्थित सर्व प्रतिनिधी / नागरिकांना नगरपरिषदेच्या निवडणुकीसंबंधी खाली नमूद केल्याप्रमाणे सविस्तर माहिती देण्यात आली-:

१) प्रभागांची संख्या
२) सदस्य संख्या
३) आरक्षण
४) प्रभागांची व्याप्ती इ.

२. सोडतीकरीता ................. शाळेतील खालील लहान मुले / मुली उपस्थित होते :-

नाव मुलगा / मुलगी

१) ------------------------------------
२) ------------------------------------
३) ----------------------------याप्रमाणे

सदर मुलांच्या हस्ते पुढील सोडती काढण्यात आल्या.

३. **अनुसूचित जाती महिलांची सोडत:-** अनुसूचित जातीकरिता......................जागा आरक्षित असून लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने आरक्षित असलेल्या प्रभागांमधून अनुसूचित जातीच्या महिलांकरिता ...............प्रभाग सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले -:

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे अनुसूचित जातीच्या प्रभागांचे क्रमांक | सोडतीमध्ये अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|
| | |

४. **अनुसूचित जमाती महिलांची सोडत:-** अनुसूचित जमातीकरिता..................जागा आरक्षित असून लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने आरक्षित असलेल्या प्रभागांमधून अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता.................... प्रभाग सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले -:

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे अनुसूचित जमातीच्या प्रभागांचे क्रमांक | सोडतीमध्ये अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|
| | |

## ५ नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांची सोडत:-

नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता असलेल्या .................. प्रभागांपैकी ................. प्रभाग नागरीकांच्या मागसवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरिता थेट अथवा सोडतीने खालीलप्रमाणे निश्चीत करण्यात आले:-

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे नागरीकांच्या मागसवर्ग प्रवर्गाच्या प्रभागांचे क्रमांक | सोडतीमध्ये नागरीकांच्या मागसवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|
| | |

**६ सर्वसाधारण महिलांची सोडत :- सर्वसाधारण असलेल्या .............प्रभागांपैकी .............प्रभाग सर्वसाधारण महिलांसाठी थेट अथवा सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले.**

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे सर्वसाधारण प्रभागांचे क्रमांक | सोडतीमध्ये सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|
| | |

वरीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरुन उपस्थित मुला / मुलीच्या हाताने उपस्थित सर्व नागरिक / प्रतिनिधी यांचे समक्ष चिठ्ठ्या काढण्यात आल्या, अथवा यथास्थिती प्राधान्यक्रम विचारात घेऊन आरक्षित प्रभाग निश्चित करण्यात आले .त्यानुसार सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जागा निश्चित करण्यात आल्या.

वरीलप्रमाणे चिठ्ठ्या टाकण्याची कार्यपध्दती सर्व उपस्थित नागरिक / प्रतिनिधी यांचे समक्ष पूर्ण करण्यात आली .त्यानंतर प्रभागनिहाय बिनराखीव जागांचा तपशिल देण्यात आला. आरक्षणाबाबत, सोडत पध्दतीनुसार निश्चित केलेल्या प्रभागनिहाय जागेबाबत कोणतीही तक्रार असल्यास आरक्षण प्रसिध्द झाल्यानंतर विहित कालावधीत हरकती व सूचना दाखल करण्याची माहिती देण्यात आली. वरीलप्रमाणे कामकाज पूर्ण करण्यात येऊन उपस्थित सदस्य / नागरिकांचे /प्रतिनिधींचे आभार मानून विषयांकीत सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**दिनांक :**

**संबंधित अधिकारी-------------नगरपरिषद.**

टीप :

(१) सभेत द्यायच्या माहितीमध्ये प्रथम कोणत्या सालाची जनगणना विचारात घेतली ते वर्ष, जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या, अ.जा. व अ.ज. ची लोकसंख्या, देय सदस्य संख्या, देय प्रभाग, देय प्रभागनिहाय सदस्य संख्या, देय आरक्षित जागांची संख्या देण्यात यावी .

(२) यानंतर उतरत्या क्रमाने आरक्षित झालेल्या अ.ज. व अ.जा. जागांची माहिती द्यावी.

(३) यानंतर प्रभागनिहाय राहिलेल्या जागांमधून कोणत्या प्रवर्गाचे सोडतीने किती चिठ्ठया काढावयाच्या आहेत याबाबत माहिती देवून सोडतीची तयारी करावी.

# परिशिष्ट – ७

नगरपरिषदेचे नाव: सोडतीचा दिनांक:

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ... | | | |
| याप्रमाणे | | | |

सही/-

नगरपरिषद मुख्याधिकारी

---------- नगरपरिषद

# परिशिष्ट – ८

नगरपरिषदेचे नाव: सोडतीचा दिनांक:

| अ.क्र. | तपशिल | आरक्षित प्रभाग क्रमांक | पैकी महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकांचा मागास प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| | **एकूण** | | |

सही/-

नगरपरिषद मुख्याधिकारी

----------- नगरपरिषद

# परिशिष्ट-९

## हरकती व सूचनांचा गोषवारा

----------- नगरपरिषद

हरकतींचा कालावधी दि ----------- .ते ------------ पर्यंत

| अ. क्र. | हरकतदाराचे नाव | हरकतीचे स्वरुप | संबंधित प्रभाग क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

उपजिल्हाधिकारी

मुख्याधिकारी
-----------नगरपरिषद

परिशिष्ट-१०

## हरकती व सूचनांवर अंतिम निर्णय

### हरकती व सूचनांवर सुनावणी दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाचे विवरणपत्र

नगरपंचायत................ सुनावणी दिनांक..........

| अ.क्र. | आक्षेप क्रमांक | हरकतदाराचे नाव | हरकतीचे स्वरुप | संबंधित प्रभाग क्रमांक | जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय | राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी यांचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

जिल्हाधिकारी प्राधिकृत अधिकारी

................नगरपंचायत